नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पामधील राज्य शासनाचा समभागापोटी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांना प्रदान करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक एमआरडी-३३१८/प्र.क्र.३९/नवि-७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ एप्रिल, २०१८.

पहा :-

१. नगर विकास विभाग शा. नि, क्र.नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दि. ३० जानेवारी,२०१४.
२. नगर विकास विभाग शा. नि., क्र एमआरडी-३३१४/प्र.क्र.११९/नवि-७, दि. १३ ऑक्टोंबर, २०१५.
३. नगर विकास विभाग शा. नि., क्र. एमआरडी-३३१४/प्र.क्र.११९/नवि-७, दि. २७ नोव्हेंबर, २०१५.
४. नगर विकास विभाग शा. नि, क्र एनएसपी-३३१४/प्र.क्र.११९/नवि-७, दि. ०४ डिसेंबर, २०१५.
५. नगर विकास विभाग शा. नि. क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र.६१/नवि-७, दि. १३ जुलै, २०१६.
६. नगर विकास विभाग शा. नि. क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र.६१/नवि-७, दि. १५ मार्च २०१७.
७. नगर विकास विभाग शा. नि. क्र. एमआरडी-३३१६/प्र.क्र.६१/नवि-७, दि. २१ मार्च, २०१७.
८. नगर विकास विभाग शा. नि. क्र. एमआरडी-३३१७/प्र.क्र.५८/नवि-७, दि. १९ जून, २०१७
९. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
१०. नगर विकास विभाग परिपत्रक क्रमांक बीयुडी-.२०१८/प्र.क्र.५५/नवि-४, दिनांक ०३ एप्रिल, २०१८

**प्रस्तावना :**

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन त्यानुसार नगर विकास विभाग शा.नि.क्र.नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दिनांक ३० जानेवारी २०१४ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पास केंद्रशासनाने पत्र क्रमांक K-१४०११/१(N-१)/२०१४-MRTS-III, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ अन्वये मान्यता दिली आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी नागपूर मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनी स्थापन करण्यात आली होती. नागपूर मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. चे जानेवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन लि. मध्ये परिवर्तन झाले आहे. सदर विशेष हेतू वहन कंपनीमध्ये केद्र व राज्यशासनाचा ५०:५० असा सहभाग आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील केंद्र व राज्य शासनाचा सहभाग हा गुंतवणूक/समभाग (Equity) व दुय्यम कर्ज सहाय्य या स्वरुपात रहाणार आहे. तसेच या प्रकल्पात नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका यांचे अनुदान देखिल उपलब्ध होणार आहे. सदर प्रकल्पासाठी वित्तीय संस्थांचे कर्ज सहाय्य घ्यावयाचे असून हे कर्ज सहाय्य केंद्र शासनामार्फत घेतले जाणार आहे. अशा प्रकारच्या सर्व निधी हा सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणी करणाऱ्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या विशेष हेतू वहन कंपनीकडे सुपूर्द करावयाचा आहे. कर्जाची परतफेड या विशेष हेतू वहन कंपनीने करावयाची आहे. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पात राज्यशासनाकडून रु.१११४ कोटी इतके समभाग (Equity) द्यावयाची आहे. त्यापैकी महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. कंपनीस राज्य शासनाच्या समभागापोटी सन २०१५-२०१६ या वर्षात रु ८४.४५ कोटी व सन २०१६-१७ मध्ये रु. १५० कोटी व सन २०१७-१८ मध्ये रु. २०० कोटी अशी एकूण रु. ४३४.४५ कोटी इतकी रक्कम आतापर्यंत महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि कंपनीस वितरित केली आहे.

०२. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता सन २०१८-१९ या वर्षात समभागापोटी रु.२५० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. यापैकी नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता रु.१७५ कोटी इतकी रक्कम महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि कंपनीस राज्य शासनाचा समभाग यासाठी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

१. नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्य शासनाचे समभाग म्हणून रक्कम रु. १७५,००,००,०००/- (अक्षरी रुपये एकशे पंच्याहत्तर कोटी फक्त) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांना प्रदान करण्यास या शासन निर्णयाव्दारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रक्कम "मागणी क्र. एफ-५, ४२१७ नगरविकासावरील भांडवली खर्च, ८० सर्वसाधारण, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांमधील गुंतवणूका, (००) (०५) नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पातील राज्य शासनाने समभाग, ५४ गुंतवणूक (४२१७०७५७)" या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची घालण्यात यावी.

३. उपरोक्त लेखाशीर्ष उपयोगात आणण्यासाठी नगर विकास विभागाचे कक्ष अधिकारी, नवि-५, यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. शासन निर्णयातील परिच्छेद -१ मध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडून काढून ती महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यास देण्यासाठी त्यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. नगर विकास विभागाच्या रोख शाखेने देयक तयार करुन ते अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे पाठवावे. याबाबतच्या खर्चमेळाची कार्यवाही नवि- ३१ कार्यासनाने करावी.

५. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांनी राज्य शासनाकडून नागपूर मेट्र रेल्वे प्रकसल्पातील समभागापोटी त्यांना सदर वितरणासह आतापर्यंत वितरित केलेल्या (रु ८४.४५ कोटी + रु.१५० कोटी + रु.२०० कोटी + सदरचे रु.१७५ कोटी) रु.६०९.४५ कोटी रक्कमेचे सदर प्रकल्पाच्या अनुषंगाने महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.चे समभाग मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या नांवे करण्याची कार्यवाही करावी.

६. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांनी राज्यशासनाकडून समभागपोटी त्यांना सदर वितरणासह आतापर्यंत वितरित केलेल्या (रु ८४.४५ कोटी + रु.१५० कोटी + रु.२०० कोटी + सदरचे रु.१७५ कोटी ) रु.६०९.४५ कोटी रक्कमेचे भांडवली समभाग महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि.कडे जमा झाल्याचे दिनांकासह प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

७. महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांनी केंद्रशासन/राज्यशासन/नागपूर सुधार प्रन्यास/ नागपूर महानगरपालिका इ. कडून प्राप्त होणाऱ्या निधीबाबतचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

८. नागपूर मेट्रो प्रकल्पासाठी प्राप्त होणाऱ्या निधीबाबत राज्य शासनाच्या वतीने सभापती, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांनी स्वतंत्र लेखे ठेवावेत व वितरीत झालेल्या निधीचे संनियंत्रण करावे.

९. व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. यांनी सदर रक्कम प्राप्त झाल्याचे व सदर रक्कम ज्या प्रयोजनाकरिता मंजूर केली आहे ती त्याच प्रयोजनाकरिता खर्च केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सभापती, नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचे मार्फत सादर करावे.

१०. राज्य शासनाकडून नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरीता आतापर्यंत रु.४३४.४५ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सदर आदेशान्वये वितरीत होणाऱ्या निधीनंतर होणाऱ्या एकूण वितरीत निधीची परिस्थिती खालील प्रमाणे

| **अनु.क्र.** | **दिनांक** | **रक्कम (रु.कोटी)** | **निधी वितरीत करणाऱ्या संस्थेचे नाव** | **एकूण वितरीत निधी (रु.कोटी)** |
|---|---|---|---|---|
| १ | १३.१०.२०१५ | ८४.४५ | राज्य शासन | ८४.४५ |
| २ | १३.०७.२०१६ | १३७.०० | राज्य शासन | २२१.४५ |
| ३ | १५.०३.२०१७ | १३.०० | राज्य शासन | २३४.४५ |
| ४ | २१.०३.२०१७ | २००.०० | राज्य शासन | ४३४.४५ |
| ५ | सदरचे वितरण | १७५.०० | राज्य शासन | ६०९.४५ |

१०. सदर निधी वितरण आदेश, वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अर्थसं.२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८ परिपत्रकातील परिच्छेद क्रमांक ७ मधील सर्व अटींचे तसेच परिपत्रकासोबतच्या परिशिष्ठातील अनुक्रमांक १ ते १० मधील अटींची पुर्तता होत असल्याने सदर परिपत्रकान्वये प्राप्त सूचनांनुसार, निर्गमित करण्यात येत आहेत.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या सांकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४२११७०२४६९७२५ असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.04.23 16:14:34 +05'30'

[वि.श्री. पाटील]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.
२. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव.

३. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
४. आयुक्त पुणे महानगरपालिका, पुणे
५. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी
६. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, सदर नागपूर
७. आयुक्त नागपूर महानगर पालिका, नागपूर
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लि. नागपूर
९. महालेखापाल- (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
१०. निवासी अधिदान व लेखा अधिकारी, (लेखा परीक्षा), मुंबई.
११. सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ३२ .
१२. अधिदान व लेखाधिकारी मुंबई
१३. वित्त विभाग (व्यय-३), अर्थसंकल्प-१६, अर्थसंकल्प-३.
१४. नियोजन विभाग (कार्यासन १४४४)
१५. उपसचिव न.वि.-५, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. कक्ष अधिकारी नवि-४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. रोख शाखा (५ प्रती)
१८. निवड नस्ती, नवि-७.